# दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा
## -: निवीदा सादर करण्याबाबत सूचना :-

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर वर्धा. या कार्यालयाचे उपयोगाकरिता ए-४ साईजचे झेरॉक्स पेपर रिम खरेदी करावयाचे आहे. करिता स्थानिक बाजारातील विक्रेत्यांना सुचित करण्यात येते की, ज्यांना झेरॉक्स पेपर रिमच्या निवीदा दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा येथे दाखल करावयाच्या आहेत, त्यांनी आपल्या निवीदा सिलबंद लिफाफ्यामध्ये दिनांक १५/१०/२०२४ रोजीचे ठिक सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत या कार्यालयात सादर कराव्यात.

**<u>खरेदी करावयाच्या साहीत्याचा तपशील</u>**

| अ.क्र. | साहीत्याची नावे | दर प्रति रिम |
|---|---|---|
| १ | झेरॉक्स पेपर(ए -४) रिफलेक्शन ७० जी. एस. एम | प्रति रिम |

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,
वर्धा

Civil Judge, Senior Division
WARDHA

**निवीदेच्या अटी व शर्ती :-**

१. निवीदेच्या लिफाफ्यावर झेरॉक्स पेपर रिम खरेदीबाबत निवीदा असे ठळक अक्षरात लिहावे तसेच दरपत्रक पाठवणा-या संस्थेचे/पुरवठादाराचे/व्यक्तीचे नाव, पत्ता व मोबाईल नंबर स्पष्ट ओळखता येईल अशा प्रकारे लिहावे. तसेच निविदा लिफाफयामध्ये नमुना कागद देण्यात यावा.

२. वेळेनंतर प्राप्त झालेल्या निवीदेचा कोणत्याही परिस्थितीत विचार केला जाणार नाही.

३. दरपत्रकामध्ये दर्शवल्याप्रमाणेच प्रती नग, दर्शवल्याप्रमाणे दर नमुद करावे..

४. दरपत्रकातील दर हा सर्व करांसह नमुद असलेले दराचा उल्लेख करावा.

५. निवीदा मंजुर किंवा नामंजूर करण्याचा सर्वस्वी अधिकार मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, वर्धा यांना राहिल.

६. दरपत्रकातील नमुद दराप्रमाणेच वस्तुचा/ साहित्याचा पुरवठा करावा लागेल.

७. साहित्याचा पुरवठा आदेश दिल्यानंतर साहित्य दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा येथे स्वत:च्या खर्चाने (निविदा मंजुर झालेल्या संस्थेला/व्यक्तीला/विक्रेत्यास) आणुन दयावे लागेल. त्याबाबत या कार्यालयामार्फत कोणताही वाहतुकीचा इ. खर्च दिला जाणार नाही.

८. निविदेतील वस्तुच्या आदेशाप्रमाणे व दरपत्रकातील दराप्रमाणे प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच सदर वस्तुच्या देयकाबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

पृष्ठांकन कमांक ११६०/ रो.व.वि.वि./ २०२४

दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा

दिनांक :- ०१/१०/२०२४

<u>प्रतिलीपी माहिती करीता व योग्य कार्यवाही करीता सादरः-</u>

१. मा. जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरिता.

२. मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरिता.

३. मा. जिल्हाधिकारी कार्यालय ,वर्धा येथील नोटीस बोर्डावर लावण्याकरिता.

४. तहसिल कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डवर लावण्याकरिता.

५. जिल्हा परिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डवर लावण्याकरिता.

६. सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्धा येथील नोटीस बोर्डवर लावण्याकरिता.

७. नगरपरिषद कार्यालय, वर्धा येथील नोटीस बोर्डवर लावण्याकरिता.

८. संगणक विभाग,जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा
सदरची प्रत जिल्हा व सत्र न्यायालय, वर्धा चे संकेतस्थळावर प्रसिध्दिकरीता.